# भारतीय राज्यघटना

दत्तात्रय वसंत पाटील संशोधक विद्यार्थी राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

---

**सारांश :**

सत्तेचा अनिर्बधीत आणि अमर्याद वापर रोखण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते. आधुनिक राज्यसंस्था फार प्रवळ आहेत. त्यांची बळ आणि दडपणूक यावर जणूकाही मक्तदारी आहे असे मानले जाते. त्यामुळे सत्तेचा मनमानी वापर करणा-या व्यक्तींच्या हाती राज्यसंस्था आल्यास काय होईल. ज्या संस्था आपण आपल्या सुरक्षेसाठी आणि कल्याणासाठी निर्माण केलल्या असतात. त्या सहजपणे आपल्या हिता विरोधात जातील जगभरातील राज्यसत्तांचा अनुभव असा आहे की अनेक राज्य संस्थांनी किमान काही व्यक्तींच्या आणि गटांच्या हितांचे फार मोठे नुकसान केले आहे. परिणामी राज्यसंस्थेवर सातत्याने नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता निर्माण झाली. भारतीय राज्यघटना अशा प्रकारे नियमनाचे मुलभूत नियम पुरविते आणि राज्यसंस्थेला जुलमी संस्था बनण्यापासून रोखते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते तर डॉ.राजेंद्र प्रसाद हे भारतीय घटना समितीचे अध्यक्ष होते. जगामध्ये ज्या राज्यघटना आहेत त्यामध्ये भारतीय राज्यघटना ही सर्वात मोठी राज्यघटना आहे. २६ जानेवारी १९५० पासून आपल्या भारतामध्ये भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी करण्यात आली तेव्हा पासून भारतात प्रजासत्ताक गणराज्य सुरू झाले.

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्रा नंतर संविधानाच्या तत्वज्ञानावर आधारीत आपल्या देशाची वाटचाल अगदी प्रभावीपणे सुरू आहे. स्वातंत्रा नंतर भारतीय संविधानाच्या मार्गाने भारतीय लोकशाहीची निर्मिती झाली ही भारतीय लोकशाही व्यवस्था म्हणजे आधुनिक मानवी मुल्यांवर आधारीत अशी नवसमाज निर्मिती होय त्यातून भारतीय समाज व्यवस्थेचा चेहराच बदलला. आधुनिक मानवी मुल्यांवर आधारीत अशी नवसमाज निर्मित्ती करून भारतीय लोकशाही आज जगाच्या पाठीवर सन्मानाने दिमाखात उभी आहे. विश्वातील सर्वात मोठी सर्वात प्रभावशाली व यशस्वी लोकशाही म्हणून जग आज भारताचा सन्मान करीत आहे. भारतीय संविधानाने स्विकारलेले तत्वज्ञान लोकशाही आणि मानवी
मुल्य यातून भारतीय समाज व्यवस्थेत मोठया प्रमाणात स्थित्यंतरे घडून आली आहेत. स्वातंत्रपूर्व कालखंडात भारत हा एकरूप असा देश नव्हता. परंतू स्वातंत्रा नंतर भारतीय संविधानामुळे हा देश समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही आणि गणराज्य स्वरूपाचा सार्वभौम असा एकसंघ राष्ट्र बनला.

इतिहासात प्रथमच प्रत्येक भारतीय नागरीक स्वतंत्र आणि सार्वभौम झाला. स्वातंत्रपूर्व कालखंडातील विषम समाज व्यवस्थेतील अज्ञान दारिद्रय अंधश्रध्दा अन्याय आणि शोषण बदलून भारतीय संविधानाने शोषणमुक्त आणि समतावादी नव्या समाज व्यवस्थेची मांडणी केली. ही नवसमाज व्यवस्था स्वातंत्र समता बंधुता न्याय व बुध्दीप्रामाण्य यामानवी मुल्यांवर अधिष्ठीत झाली. आज हा देश राजेरजवाडयांच्या सरंमजामशाही समाजव्यवस्थेच्या तसेच वर्णा श्रमाधिष्ठीत उतरंडीच्या समाज व्यवस्थेतून बाहेर पडून समतामुलक लोकशाही समाजव्यवस्थेवर उभा आहे त्यातूनच आज सामाजिक आर्थिक राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात मोठी स्थित्यंतरे घडून आली आहेत. देश आज संविधानिक नितीवर आधारीत समताधिष्ठीत लोकशाही राष्ट्र म्हणून यशस्वीरित्या वाटचाल करीत आहे.
यास्थित्यंतराचे सर्व श्रेय हे केवळ संविधानात आहे. संविधान किती अभ्यासपूर्ण प्रयत्नातून बनवले आहे हे मांडताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले होते की त्यांनी त्रिखंडातील घटना चाळून पाहिल्या प्राचीन व आधुनिक घटना धुंडाळून भारतीय संविधानाचा मसुदा तयार केला गेला. २५ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीच्या समारोपाच्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते "२६ जानेवारी १९५० रोजी भारत लोकसत्ताक देश होणार याचा अर्थ असा की लोकांचे राज्य लोकांनी चालवलेले राज्य आणि लोकांसाठी चालवलेले राज्य भारताला त्या दिवसापासून मिळेल.

**उद्देश :**

भारतातील सर्व राज्यांमध्ये राज्यातील प्रत्येक जिल्हांमध्ये आणि जिल्हातील प्रत्येक तालुक्यामध्ये तालुक्यातील प्रत्येक गावात आणि प्रत्येक गावातील प्रत्येक घरांपर्यंत प्रत्येकाला राज्यघटना समजली पाहिजे आणि यासाठी भारतीय संविधानाचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. न्याय समता स्वातंत्र बंधुता या तत्वावर समाजाची समाज रचना झाली पाहिजे. समाजातील जाती विषमता नष्ट व्हायची असेल तर समाजातील जातीभेदाचे निर्मुलन होऊन समाजात सामाजिक समानता निर्माण होणे आवश्यक आहे.

**विषय स्पष्टीकरण ः**

भारतीय घटना समितीचे स्वरूप आणि कामकाज

१९४६ च्या कॅबिनेट मिशन योजनेत अशी तरतूद करण्यात आली होती की भारतसाठी नवी राज्यघटना निर्माण करण्यासाठी घटना समिती निर्माण करण्यात यावी. या घटना समितीत सदस्य संख्या ३८९ निश्चित करण्यात आली. ब्रिटीश भारतातील २९२ प्रतिनिधी देशी संस्थांनांचे ९३ प्रतिनिधी आणि चिफ कमिशनरच्या प्रांतातील ४ प्रतिनिधी अशी ३८९ सदस्यांची घटना समिती निश्चित करण्यात आली होती.

कॅबिनेट मिशन योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना समितीच्या सदस्यांची निवडणूक घेण्यात आली. २९२ जागापैकी २११ कॉंग्रेस पक्षाला आणि ७३ जागा मुस्लीम लिगला मिळाल्या वसाहती व मांडलिक संस्थानांच्या ९३ जागा पूर्ण पणे भरल्या नाहीत.

घटनासमिती सार्वभौम नव्हती कारण तीचे कार्य कॅबिनेट मिशन योजने नुसार चालणार होते तसेच घटना समितीतील प्रतिनिधी जनतेने निवडून दिलेले प्रत्यक्ष प्रतिनिधी नव्हते. त्यांची निवड प्रांतांच्या विधी मंडळातील प्रतिनिधीं मार्फत झालेली होती. घटना समितीत विविध पक्षांचे हित संबंधी गटाचे प्रतिनिधी होते. कॉंग्रेसपक्ष मुस्लिम लिग इंडियन ख्रिश्चन वर्गीकृत जाती संघटना पारशी उद्योग व्यवसाय गट ॲंग्लो इंडियन शिख आदिवासी संस्थानिक स्त्रिया कायदे पंडीत इ. गटांचे प्रतिनिधी घटना समितीत होते.

डॉ.राजेंद्र प्रसाद पंडित जवाहरलाल नेहरू सरदार वल्लभभाई पटेल अब्दुल गफारखान मौलाना अबुल कलम आझाद डॉ.खरे डॉ.राधाकृष्णण अल्लादी कृष्णास्वामी अय्यर कन्हैयालाल मुन्सी टी.टी.कृष्णमाचारी श्रीकृष्ण सिन्हा पुरूषोत्तमदास टंडन आचार्य कृपलानी सर फिरोजखान नून हृदयनाथ कुंझरू डॉ.सच्चिदानंद सिन्हा बॅ.जयकर डॉ.आंबेडकर डॉ.शामप्रसाद मुखर्जी शंकरराव देव विजयालक्ष्मी पंडित सरोजिनी नायडू पट्टाभी सितारामय्या दुर्गाबाई देशमुख बेगम रसूल एन.माधवराव बावु जगजीवनराम चक्रवर्ती राज गोपालचारी एन.गोपाल स्वामी अय्यंगार डॉ.जान मथाई राजकुमारी अमृत कोर फॅंक अंथनी सरदार बलदेव सिंग सरदार हुकुमसिंग बिजलाल बियाणी राजबहादूर डी.पी.खैतान इ.नामवंत व प्रसिध्द व्यक्ती घटनासमितीवर घेण्यात आलेल्या होत्या. समायाच्या सर्व स्थरातील अनुभवी व हुशार व्यक्तींचा घटना समितीत समावेश करण्यात आलेला होता.

घटना समितीची पहिली बैठक दिल्ली येथे ९ डिसेंबर १९४६ रोजी घेण्यात आली. तात्पुरते अध्यक्षपद डॉ.सच्चिदानंद सिन्हा यांचेकडे देणेत आले होते. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ.राजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली ते घटना समितीचे पूर्ण काम होईपर्यंत अध्यक्ष होते.

**निष्कर्ष ः**

दुस-या बाजूला विषम समाज व्यवस्थेचे सरंजामशाही वृत्तीचे परंपरागत सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक सत्ताधारी व त्या विषम व्यवस्थेचे मुठभर लाभार्थी लोक आज भारतीय संविधान व वर्तमान भारतीय लोकशाही व्यवस्थेला विरोध करीत आहेत. ब्राम्हण्याधिष्ठीत वर्ण वर्चस्ववादी व जातीय व्यवस्थेचे समर्थक असणा-या राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार आणि भारतीय जनता पक्ष यांच्याकडून भारतीय संविधान व भारतीय लोकशाहीस नाकारण्याचा प्रयत्न होत आहेत हे लोक विषमतेचे समर्थक आहेत. हे प्रतिगामी विचारसरणीचे लोक आहेत. वेगवेगळया मार्गाने ते संविधानास डिवचण्याचा प्रयत्न करीत आलेले आहेत. त्यातून देश आज संघर्षाच्या एका नव्या वळणावर येऊन पोहोचला आहे. देशात एक नवा संघर्ष ऊभा राहिला आहे. देशात आज लोकशाही विरोधी प्रतिगामी शक्ती तोंड वर काढत आहेत. यामुळे राष्ट्रीय ऐक्य आणि स्वास्थ यांना धोका पोहोचल्याची चिन्हे दिसत आहेत.

**संदर्भ सुची ः**

१. तुकाराम जाधव डॉ.महेश शिरापूरकर “राजकीय सिध्दांत संकल्पना व भारतीय राज्यघटना” द युनिक ॲकॅडमी पूणे पहिली आवृत्ती २०२२
२. रंजन कोळंबे “भारताची राज्यघटना आणि प्रशासन” भगीरथ प्रकाशन पुणे पहिली आवृत्ती२०१३-१४
३. प्रा.बी.बी.पाटील “भारतीय राज्यघटना व शासन” फडके पब्लिकेशन कोल्हापूर
४. महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन “भारताचे संविधान”
५. डॉ.विजय काळेबाग “संविधानाचे विरोधक” भारतीय लोकशाहीचे शत्रू प्रज्ञादिप पब्लिकेशन कोल्हापूर प्रथम आवृत्ती २६ नोव्हेंबर २०२४ ( संविधान दिन )